# “# मी टू”

“बी अवेयर ... टूडेज स्वीटू मे बी टुमारोज मी टू”...

“# me too” च्या विरोधात पुरुषांची कॅम्पेन “Pi too”

तनुश्री दत्ताच्या केसनंतर “# मी टू ” चळवळ जोरात सुरू झाली आणि व्हॉटस अपवर अशा विनोदांचा पाऊस पडला. अतिशय बेफिकीरपणे, बेजबाबदारपणे व्यक्त होण्याची अहमहमिकाच लागली आणि “तनुश्री दत्ता ईतकी वर्षे झोपली होती का ईथपासून बॉलीवूड मध्ये अश्या तडजोडी स्वत:हून करणाऱ्या स्त्रिया अशा तक्रारी कशा करू शकतात असे अनेक प्रश्न उपस्थित झाले. मुळात “# मी टू” ही चळवळ प्रथम परदेशात सुरू झाली ती लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागणाऱ्या स्त्रियांनी व्यक्त व्हावं .. आपल्यासारखा अनुभव ईतर स्त्रियांनाही आला आहे, येतो आहे हे पीडित स्त्रीला कळावे म्हणून ! ‘ होय मी सुद्धा हे अनुभवलं आहे आणि ते सांगण्याचं धाडस मी करते आहे कारण त्यात माझा काही गुन्हा नाही आहे’ असं व्यक्त होणे हेच ह्या चळवळीकडून अपेक्षित आहे. ह्या बोलणाऱ्या स्त्रियांना मदत देणे, त्यांचे ऐकून घेणे व आरोपीच्या अधिकारांना बाधा न आणता त्यावर काही उपाय करणे हे गरजेचे व शक्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने “विशाखा” निकालात आणि त्यानंतर आलेल्या “कामाच्या ठिकाणी होणारे स्त्रियांचे लैंगिक शोषण (अटकाव, प्रतिबंध व निवारण) कायदा, २०१३” मध्ये हे स्पष्ट केलेले आहे की स्त्रियांनाही समानतेचा, सन्मानाने जगण्याचा व सुरक्षित वातावरणात काम करण्याचा मूलभूत अधिकार आहे. आपल्या पितृसत्ताक समाज पद्धतीत स्त्रियांचे दमन व शोषण ही सामान्य बाब आहे आणि स्त्रियांचे लैंगिक शोषण करणे हा तिचा गैरफायदा घेण्याचा, तिच्या आत्मसन्मानाला ठेच पोचवण्याचा, तिच्यावर सत्ता गाजवण्याचा एक सोपा मार्ग समजाला जातो. कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण झाल्यास स्त्रीचा कामाचा किंवा काम करून सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकारच हिरावला जातो आणि म्हणूनच “कामाच्या ठिकाणी होणारे स्त्रियांचे लैंगिक शोषण (अटकाव, प्रतिबंध व निवारण)

कायदा, २०१३" हा अतिशय महत्वाचा कायदा असून प्रत्येक आस्थापना, सरकारी, निमसरकारी संस्था, कार्पोरेशनस, स्पोर्ट्स अकॅडेमीज, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, प्रत्येक खाजगी आस्थापना, करारावर काम करणारे अशा सर्वांना लागू आहे. हा कायदा केवळ सुसंघटित (Organized) क्षेत्रासाठीच आहे हा समज पूर्णपणे खोटा असून संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांसाठी हा कायदा आहे. जे जे कामाचे ठिकाण आहे ते ते ह्या कायद्याच्या प्रभावाखाली येते मग ते तुमचे आमचे घरही असेल. होय .. आपल्या घरात काम करणाऱ्या नोकराणीसाठी आपले घर ही कामाची जागा आहे आणि तिथे तिचे लैंगिक शोषण झाले तर तिला न्याय मागण्याचा पूर्ण अधिकार ह्या कायद्याने दिला आहे.

ह्या कायद्याने प्रथम "लैंगिक शोषण" म्हणजे काय ह्याची व्याख्या केली असून थोडक्यात " लैंगिक सुखाची मागणी, लैंगिक सुखासाठी पुढाकार घेणे, अश्लील साहित्य दाखवणे, पाठवणे, अश्लील शेरेबाजी करणे या बरोबरच स्त्रीला मान्य नसणारे मौखिक वा शारीरिक कोणतेही लैंगिक स्वरूपाचे वर्तन" हे लैंगिक शोषणात येते. लैंगिक शोषणाला सामोरी जाणारी स्त्री पोलिसात सहज तक्रार करू शकत नाही हे जाणून ह्या कायद्याने १० पेक्षा जास्त कर्मचारी असणाऱ्या प्रत्येक आस्थापनेसाठी "अंतर्गत समिती" (पूर्वीची अंतर्गत तक्रार निवारण समिति) असणे बंधनकारक केले असून ह्या समितीत ५०% स्त्रिया, अध्यक्षपदी स्त्री व एका गैरसरकारी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश हा बंधनकारक करण्यात आला आहे. दहापेक्षा कमी कर्मचारी असणाऱ्या आस्थापनांमधील तक्रारीसाठी जिल्हास्तरीय "स्थानिक समिति"ची स्थापना करण्यात आली असून त्यातही ५०% स्त्रिया, अध्यक्षपदी स्त्री, दोन गैरसरकारी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश व महिला व बाल विकास खात्याच्या अधिकाऱ्याचे प्रतिनिधित्व असणे बंधनकारक आहे. ह्या कायद्यातच तक्रार कशी करावी, समितीने कशा पद्धतीने चौकशी करावी, किती दिवसात चौकशी करावी, अहवाल कुणाला सादर करावा, चौकशी अहवाल मालकावर बंधनकारक असून तो त्याला स्वीकारावाच लागतो या सर्व बाबी स्पष्ट केलेल्या आहेत. या कायद्यानुसार अशी समिति गठण न केल्यास मालकाला रु. ५०,०००/- पर्यन्त दंड होऊ शकतो व मध्यंतरी वोडाफोन कंपनीला असा दंड करण्यात आलेला आहे.

ह्या ज्या समिति कायद्यानुसार असणे गरजेचे आहे त्यांनी फक्त लिखित तक्रारींवरच कारवाई करणे अपेक्षित नाही  तर एखादीने तोंडी तक्रार केली किंवा प्रत्यक्ष तक्रार न करता समितीला ईतर मार्गाने लैंगिक शोषणाची माहिती मिळाली तरी समिति औपचारिक कार्य पद्धत वापरू शकते जसे की त्या महिलेशी संवेदनशीलतेने बोलणे, तिला गरज असेल तसे उपचार, समुपदेशन यांची सोय करणे व ईतर प्रतिबंधात्मक पाऊले उचलणे ई. महिलेला रीतसर कारवाई गरजेची वाटत नसेल व अनौपचारिक कारवाई पुरेशी असेल तर लेखी तक्रारीचा आग्रह न धरता समिति अशी कारवाई करू शकते. कारण ह्या कायद्यानुसार स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी  सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही मालकाची जबाबदारी आहे. एखाद्या स्त्रीने लैंगिक शोषणाविरुद्ध पोलिस तक्रार केली तर ती मात्र क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या तरतुदींनुसार चालेल. मात्र सध्या जो “#मी टू” चळवळीवर उगीचच पुरुषांची बदनामी केल्याचा आरोप केला जातो आहे तो जाणूनबुजून केला जात असून त्या पुरुषाला बदनामीचा दावा दाखल करण्याची मुभा आहे हे सोयिस्कर दुर्लक्षित केले जात आहे.

तनुश्री दत्ताच्या तक्रारीचा विचार करता काम करताना अयोग्य व अनुचित स्पर्श केल्याची तिची तक्रार असल्याने ती वर उलेखलेल्या कायद्याच्या कक्षेतच येते व तिच्या तक्रारीची व ‘मी टू’ चळवळीतील तक्रारींची अनौपचारिक दाखल संबंधित समित्यांनी घ्यायला हवी. पण मग प्रश्न असा आहे की तेव्हा किंवा आताही बॉलीवुडमध्ये किंवा सिने असोसिएशन तर्फे अशी कायद्याने बंधनकारक असणारी समिति का गठित केली नव्हती? (नुकतीच अशी समिति करण्यात आली आहे असे ऐकिवात आहे.) ह्या समितीच्या स्थापनेसाठी, कायद्यात बंधनकारक केलेल्या जागृती व प्रशिक्षण (awareness and training) कार्यक्रमांसाठी काय प्रयत्न झाले ? किती कलाकारांना ह्याची माहिती होती वा आहे? केवळ बॉलीवुडच नव्हे तर अश्या अनेक आस्थापना आहेत जिथे अश्या समित्या नाहीत, असल्या तर त्या कायद्यात दिल्याप्रमाणे नाहीत, त्यामध्ये गैरसरकारी संस्थेचे प्रतिनिधित्व नाही ही वस्तुस्थिती आहे आणि त्यावर कुणाचीही देखरेख नाही.  खरे तर कायद्याने बंधनकारक केलेल्या ह्या समितीने वर्षातून किमान एकदा सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे तसेच प्रत्येक आस्थापेनची लैंगिक हिंसेला प्रतिबंध करणारी पॉलिसी असणेही बंधनकारक आहे.

आम्ही आमच्या "वॉइस फॉर जस्टिस" ह्या गैरसरकारी संस्थेतर्फे ह्या कायद्याचे प्रशिक्षण व जागृतीचे कार्यक्रम करतो, पॉलिसी तयार करायला मदत करतो आणि गैरसरकारी संस्थेचे प्रतिंनिधी म्हणून समितीवर काम करतो  तेव्हा लक्षात येते की कितीतरी सुशिक्षित, उच्च विद्या विभूषित लोकांना ह्या कायद्याची माहिती नाही. एखाद्या स्त्रीकडे टक लावून बघणे वा "शीलाकी जवानी" सारखी गाणी म्हणणे हे त्या स्त्रीला मान्य नसेल तर ते तिचे लैंगिक शोषण आहे असे आम्ही सांगतो तेव्हा अनेक भुवया उंचावल्या जातात. पण अश्या अनेक  कृती केवळ ह्या कायद्याखालीच नव्हे तर "फौजदारी कायदा सुधारणा २०१३" नुसार ही गुन्हा आहेत हे पुरूषांना कळण्याची गरज आहे म्हणजे सहज जाता जाता किंवा चालतय म्हणून वेगवेगळ्या माध्यमातून होणारे लैंगिक शोषण थांबेल.  पितृसत्ताक पद्धतीचा प्रभाव अजूनही आपल्यावर कसं आहे ह्याचा एक अनुभव मध्यंतरी आला. एका मोठ्या सरकारी कार्यालयात एका  तरुण मुलीने तिच्या सहकाऱ्याने कार्यालयात, हॉस्टलमध्ये येऊन लैंगिक शोषण केल्याबद्दल समितीकडे तक्रार केली. समितीच्या सदस्यांनी "त्या मुलाची नोकरी जाईल, तो एकटाच कमावता आहे" म्हणून तिच्यावरच दबाव टाकून तक्रार मागे घेण्यास सुचवले. समिति सदस्यांचे योग्य प्रशिक्षण झाले नसल्यास काय होते ह्याचे हे उत्तम उदाहरण!

"# मी टू" ही सामाजिक चळवळ असली तरी त्यातूनही बरेच काही साध्य झाले आहे. अमीर खान सारखा कलावंत "# मी टू" ला पाठिंबा देताना अश्या आरोपीतांबरोबर काम करण्याचे नाकारतो तेव्हा ह्या चळवळीचा परिणाम दिसून येतो. ह्या चळवळीच्या माध्यमातून स्त्रिया बोलायला पुढे येत आहेत त्याचे स्वागत व्हायला हवे, त्यावर उपाय व्हायला हवेत आणि सर्वांकडून एक नवीन चळवळ "# वुई टू अगेन्स्ट सेक्शूयल हरॅसमेंट" सुरू व्हायला हवी.

-----